## <u>कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो-३ मार्ग</u>

### मुं.मे.रे.कॉ तर्फे आयोजित मराठी भाषा संवर्धन पंढरवड्याचा समारोप

### मराठी भाषेला मरण नाही - प्रसिद्ध कलाकार श्री. सुभाष अवचट

**मुंबई, २९ जानेवारी, २०२१:-** मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनद्वारे (मुं.मे.रे.कॉ) आयोजित मराठी भाषा संवर्धन पंढरवड्याचा समारोप नुकताच पार पडला. यावेळी जगप्रसिद्ध चित्रकार व ज्येष्ठ साहित्यिक, कवी व नट श्री. सुभाष अवचट यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

यावेळी बोलताना ते म्हणाले , "मराठीतील कला, संस्कृती आणि साहित्य अतुलनीय आहे आणि कोणालाही आज किंवा भविष्यात तिच्या अस्तित्वाची चिंता करण्याची गरज नाही. इंग्रजी भाषेची भीती ही जगात सर्वत्र आहे कारण ही व्यापारी भाषा आहे. मात्र तिचे कौतुक इतर भाषांप्रमाणे नाही. जो पर्यंत संस्कृती आहे तो पर्यंत मराठी भाषेला मरण नाही. प्रत्येकाने स्वतःतील न्यूनगंड बाजूला सारत भरपूर वाचन करावे, दर्जेदार नाटक व चित्रपट पहावेत.आपली भाषा जपविणे ही आपली वैयक्तिक जबाबदारी आहे", असेही श्री. अवचट म्हणाले.

मराठी भाषा संवर्धन पंढरवडा निमित्त आयोजित करण्यात आलेल्या विविध स्पर्धांमध्ये मराठी व अमराठी भाषिक कर्मचा-यांच्या नोंदविलेल्या उत्स्फूर्त प्रतिसादासाठी व्यवस्थापकीय संचालक (मुं.मे.रे.कॉ), श्री. रणजीत सिंह देओल यांनी कर्मचा-यांचे कौतुक केले व विजेत्यांचे अभिनंदन केले. यावेळी संचालक (प्रणाली) श्री. ए.ए. भट्ट यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

यावेळी संचालक (प्रकल्प) श्री. एस.के. गुप्ता, संचालक (वित्त) श्री. अबोध खंडेलवाल, कार्यकारी संचालक (नियोजन) श्री. आर. रमणा, कार्यकारी संचालक (रोलिंग स्टॉक) श्री. राजीव आणि कार्यकारी संचालक (सिग्नल अँड टेलिकॉम) श्री. राजीव कुमार आणि मुं.मे.रे.कॉचे अन्य वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

पुरस्कार विजेते -
निबंध लेखन - १) सूरदास भोसले २) मयूर कदम ३) ज्योति नायर
अभिवाचन - १) मयूर कदम २) ज्योति नायर ३) नीति तामसे
घोषवाक्य - १) नभा शिरोडकर २) ज्योति नायर ३) सागर लिपणे ४) उमेश पेठे
कविता लेखन - १) नभा शिरोडकर २) ज्योति नायर ३) कुशल नेहेते ४) रूपेश वानखेडे
प्रश्न मंजूषा - १) प्रशांत शिंदे २) रूपेश वानखेडे ३) भारत कांबळे ४) महेश कुमार डांगे

For further information please contact: -

Vaidehi More
9028543087
vaidehi.more@mmrcl.com

Niti Tamse
8369727364/9664215544
niti.tamse@mmrcl.com